४.१५
१२-०७-२०२३
आ.क्र.

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १२/०७/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने शाळा क्रमांक २९ येथे विद्यार्थ्यांसाठी दिनांक ११ जुलै, २०२३ रोजी दंत चिकित्सा तपासणी शिबीर आयोजन करण्यात आले होते. या शिबीराला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून, यावेळी श्री. अजीज शेख मा. आयुक्त, उल्हासनगर म.न.पा., डॉ. करुणा जुईकर अति. आयुक्त (सेवा), श्री. जमीर लेंगरेकर अति. आयुक्त (शहर), डॉ. सुभाष जाधव उप आयुक्त (वैद्यकीय आरोग्य वि.), श्रीमती निलम कदम उप-लेखा अधिकारी (शिक्षण वि.) आदि उपस्थित होते. या प्रसंगी श्री. अजीज शेख, मा. आयुक्त, उ.म.पा. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दंत चिकित्सा विभागातील डॉक्टरांच्या पथकांनी शिबीरात पहिली ते पाचवी पर्यंतच्या १३५ विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी केली. यावेळी विद्यार्थ्यांना टुथ पेस्ट आणि टुथ ब्रशने दातांची निगा कशी राखावी याबद्दल माहिती दिली तसेच प्रात्यक्षिक देखील करुन दाखवले. प्राथमिक तपासणीनंतर काही विद्यार्थ्यांना दातांची समस्या असल्यास त्यांना पुढील उपचाराकरीता दंत तज्ञाकडे पालकांसोबत पाठविण्यात येईल. यावेळी विद्यार्थ्यांना टुथ ब्रशचे वाटप करण्यात आले व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला होता.

अशा प्रकारची दंत तपासणी म.न.पा.च्या सर्व शाळांमध्ये करण्यात येणार असून दंतरोग बाधित मुलांच्या पालकांना सुध्दा त्याबाबत अवगत करण्यात येणार आहे.

12/7/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.